स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर करावयाचा प्रबंधकाचे प्रारुप

:: अभ्यास विषय ::

नांदेड जिल्ह्यातील कौटूंबिक न्यायालयात कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत गुन्हा नोंद केलेल्या महिलांना शिक्षण घेतांना येणाऱ्या समस्या - एक अभ्यास

:: संशोधिका ::

संध्या सोपानराव तुप्पेकर
एम.ए.(हिंदी), एम.ए.(समाजशास्त्र),एम.एड.,एम.फिल.

:: मार्गदर्शक ::

प्राचार्य डॉ.मधुकर अंबाजी पुंडगे,
एम.ए.,एम.एड.,पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)
श्री संत गाडगे महाराज शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
बलसोंड, हिंगोली

२०१९

नांदेड जिल्ह्यातील कौटूंबिक न्यायालयात कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत गुन्हा नोंद केलेल्या महिलांना शिक्षण घेतांना येणाऱ्या समस्या - एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या अंशतःपूर्ततेसाठी
सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

:: संशोधिका ::

संध्या सोपानराव तुप्पेकर
एम.ए.(हिंदी), एम.ए.(समाजशास्त्र),एम.एड.,एम.फिल.

:: मार्गदर्शक ::

प्राचार्य डॉ.मधुकर अंबाजी पुंडगे,
एम.ए.,एम.एड.,पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)
श्री संत गाडगे महाराज शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
बलसोंड, हिंगोली

:: संशोधन केंद्र ::

शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड

२०१९

१. संशोधनाची प्रस्तावनाः

भारत हा जातीप्रधान देश असून भारतामध्ये विविध जाती-धर्माचे लोक सामाजिक विविधता या घटकाच्या अंतर्गत नांदत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने भारतीय संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य या मूल्यांच्या आधारावर महिलांना शिक्षण देणे हे क्रमपात्र असून भारतीय समाज व्यवस्थेचा ते एक वैशिष्टये मानले जाते. तरी पण भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जातीप्रथा हा घटक खूप महत्वपूर्ण राबवला जातो. महिलांना योग्य प्रकारे शिक्षण देणे हा परिपूर्णपणे राज्यघटनेचा मूलभूत हक्क असला तरी आजही महिलांना पाहिजे त्याप्रमाणामध्ये शैक्षणिक सुविधांची उपलब्धता होत नाही व त्याकारणास्तव कितीही महिला शिकले तरी चूल आणि मूल यांच्या अंतर्गत त्यांचं शिक्षण केले पाहिजे अशी समाजाची भूमिका व मानसिकता असते.

सामाजिक स्तरावर आपणास असे लक्षात येते की महिलांना देण्यात येणारी दुय्यम भूमिका व दर्जा हा त्यामागील मुख्य कारण आहे व याबरोबरच महिलांना शिक्षण घेताना येणाऱ्या विविध अडचणी खूप मोठया स्वरुपात आहेत. महिलांना विविध समस्यांना नेहमी तोंड द्यावं लागतं. केवळ कुटूंबाबरोबर असतांना कुटूंबातील सर्व सदस्यांची काळजी घेणे, त्यांचे संपूर्ण पोष्ज्ञण करणे त्याच्या नंतर मग वेळ काढून आपले शिक्षण घेणे जर कुटूंब व्यवस्थेतील संपूर्ण कुटूंबातील सर्वजनांचा जर पूर्णपणे मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि आर्थिक जर पाठिंबा नसेल तर एक महिला त्यामानाने संपूर्ण बाजूने मानसिकरित्या एक महिला कमजोर होते आणि जर घरच्या मंडळींनी जर शिक्षणासाठी तिला उभे केले नाही तर मग त्यांचा परिणाम फार मोठया स्वरुपामध्ये वैयक्तिक विकासाबरोबरच व्यक्तिमत्व विकासावर पण होतो. आजच्या एकविसाव्या शतकामध्ये महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून जरी फार मोठया प्रमाणात नाही तरी थोडया प्रमाणात तरी दिसत असल्या तरी फार मोठा वर्ग हा कौटूंबिक हिंसाचार कायद्याच्या अंतर्गत असलेला आपल्याला पहावयास मिळतो. महिलांना शिक्षण घेणे व ते घेण्यासाठी कुटूंबातील लोकांचा दबाव नेहमी महिलांना सहन करावा लागतो. कुटूंबातील सर्वच व्यक्ती हे त्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात महिलांच्या पूर्णपणे सहकार्य करतील याची शाश्वती कधीही देता येत नाही.

शैक्षणिक पात्रता असलेले लोकही त्याबाबतीमध्ये खूप मोठया प्रमाणामध्ये यास विरोध करतात म्हणजेच काय केवळ महिलांनी शिक्षण न घेता केवळ चूल आणि मूल यातच राहावे का? हा सर्वात मोठा प्रश्न असून जर महिलांनी शिक्षण घेऊन त्यांना शैक्षणिक अडचणी येत असतील

तर अशा महिला खूप मोठया प्रमाणामध्ये कौटूंबिक न्यायालयामध्ये दाद मागण्यासाठी येत असतात आणि अशा दाद मागण्यासाठी त्यामध्ये कोणत्या स्वरुपाचे प्रश्न त्यामध्ये उपलब्ध होतात किंवा उध्दवतात याचा आढावा घेणे गरजेचे असून प्राथमिक स्तरावर कौटूंबिक हिंसाचा कारदा २००५ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील विविध स्तरावर किती प्रमाणामध्ये केसेस दाखल आहेत व दखलपात्र केसेसमध्ये त्यासर्वांचे प्रमुख कारण हे शिक्षण आहे का याचा शोध घेणे गरजेचे असून जर शिक्षणामध्ये महिलांना कौटूंबिक हिंसाचारास तोंड द्यावे लागत असेल तर त्याबाबतीमध्ये महिलांनी मग कुठे दाद मागायची. एकीकडे भारतीय संविधानास पूर्णपणे शिक्षणाची व मूलभूत हक्काची जाणीव करुन देते तर दुसरीकडे भारताची समाज व्यवस्था जातीव्यवस्थेकडे पाठ करुन त्यांना ज्या प्रमाणामध्ये पाहिजे त्याप्रमाणामध्ये स्वातंत्र्य देत नाही मग हा विरोधाभास आपल्याला कुठे पाहावयास मिळतो.

तशाच प्रकारे कौटूंबिक न्यायालयामध्ये अशा किती प्रकारच्या केसेस दरवर्षी दाखल होतात, मग दाखल होण्यामुळे त्याच्या प्रमुख कोणते कारणे असतात आणि त्याकारणांचा शोध घेण्यासाठी कौटूंबिक हिंसाचार कायदा २००५ अंतर्गत शैक्षणिक संदर्भात महिलांना येणाऱ्या विविध शैक्षणिक, सामाजिक, मानसिक आणि आर्थिक स्वरुपाच्या काही समस्या आहे या समस्यांचा आढावा घेणे महत्वपूर्ण असून त्यातच त्यांचा व्यक्तिमत्व विकासामध्ये समस्या निर्माण होतात त्यामुळे या विषयाची प्रस्तावना करत असताना असे आढळते. शैक्षणिक न्यालय व कौटूंबिक न्यायालयामध्ये ज्या काही कौटूंबिक हिंसाचार कायद्याअंतर्गत दाखलपात्र दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण हे वेगवेगळया स्वरुपाचे असून त्यातील बऱ्याच अंशी महिलांना त्याबाबतीत सूट मिळत नाही व त्यांना विविध समस्या आल्याच नाही तर मानसिक, शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते. कुटूंबातील महिलांवर होणाऱ्या विविध अन्याय-अत्याचाराच्या विरोधात त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व न्यायाच्या दृष्टिकोनातून महिलांना सर्व प्रकारचा त्रासातून, जाचातून अन्याय-अत्याचारातून मुक्त करण्यासाठी कौटूंबिक न्यायालयांची रचना करण्यात आलेली आहे.

२. संशोधनाची कार्यात्मक व्याख्या:

नांदेड जिल्हा:

महाराष्ट्र राज्यातील एक प्रशासकीय जिल्हा होय. गोदावरी नदी काठी वास्तव्यास असलेले एक शहर महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सिमेलगत नांदेड जिल्हा वसलेला आहे.

कौटूंबिक न्यायालय:

वैवाहिक व कौटूंबिक कलह सोडविण्यासाठी विविध ठिकाणी कौटूंबिक न्यायालय स्थापन करण्यासाठीचा कायदा १९८४ म्हणजेच कौटूंबिक न्यायालय होय.

कौटूंबिक हिंसाचार कायदा:

पीडित व्यक्ती शारीरिक अवयवास कल्याण आस जीवितास हाणी पोहोचत असेल किंवा मानसिक, शारीरिक इजा होत असेल आणि शारीरिक, लैंगिक, मौखिक, भावनिक, आर्थिक छळ होत असेल किंवा

त्रास, हाणी, इजा किंवा पीडित व्यक्तीच्या जीवितास धोका पोहोचत असेल किंवा पिडित व्यक्ती महिलेवर किंवा तिच्या नात्यातील व्यक्तीस दबाव निर्माण करुन काही बेकायदेशीर त्याची मागणी करण्यात आली असेल किंवा हुंड्याची मागणी करण्यात आली असेल.

किंवा

पीडित महिलेस किंवा तिच्या नातलगांना धमकावण्याचे कृतीवर कलम व मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणतेही कृत्य व्दारे धमकी देण्याचा प्रभाव पाडणारी असेल किंवा पीडित महिलेशी शारीरिक किंवा मानसिक हानी पोहोचवणारे असले.

केंद्र शासनाने कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची स्थापना करण्यात आलेली आहे तर कुटूंबातील होणारा हिंसाचार त्याच्या विरोधात महिलांना देण्यात येणारे संपूर्णपणे संरक्षणाची नोंद व कार्यवाही ही या कायद्यामध्ये घेतली जाते.

मधील -

कौटूंबिक हिंसाचार कायद्याअंतर्गत दाखल करण्यात येणाऱ्या विविध समस्या व महिलांच्या तक्रारी, महिलांना शिक्षणामध्ये येणाऱ्या विविध अडचणी या कायद्यामध्ये समाविष्ट आहेत.

गुन्हा -

बेस्टरच्या मताप्रमाणे कायदे व संप्रदाय काही मूल्यांवर आधारलेली असतात व त्या विरुध्द जॅक वर्तन असेल तो गुन्हा होय किंवा **गिल** यांच्या मताप्रमाणे मानवी समाजाच्या एका समुदायाच्या मते जे कृत्य समाजात समाजास हानिकारक ते कृत्य गुन्हा होय.

महिला शिक्षण -

भारतीय राज्यघटनेच्या कलम 21A अंतर्गत देण्यात येणारे महिलांना शिक्षण त्यास महिला शिक्षण असे म्हटले जाते.

शैक्षणिक समस्या -

कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत येणाऱ्या महिलांना शिक्षण घेताना विविध शैक्षणिक समस्यांचा आढावा म्हणजेच शैक्षणिक समस्या होय.

एक अभ्यास -

तर्क, अनुभव, निष्कर्ष या घटकाव्दारे पडताळणी करुन साधक-बाधक रितीने केलेला अभ्यास म्हणजे एक अभ्यास होय. कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत येणाऱ्या विविध समस्यांचा व त्यातील चलाचा अभ्यास करणे.

३. संशोधनाची उद्दिष्टे:

१) नांदेड जिल्ह्यातील कौटूंबिक न्यायव्यवस्थेचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील कौटूंबिक न्यायालयात कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांचा शोध घेणे.

३) नांदेड जिल्ह्यातील महिलांना शिक्षण घेताना येणाऱ्या शैक्षणिक, कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक आणि मानसिक समस्यांमुळे दाखल झालेल्या केसेसचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्ह्यातील महिलांना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणीमध्ये कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत दाखल केलेल्या प्रमुख समस्यांचा अभ्यास करणे.

५) नांदेड जिल्ह्यातील कौटूंबिक न्यायालयामध्ये कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत येणाऱ्या विविध शैक्षणिक समस्यांच्या संदर्भात शिफारशी सुचवणे.

४. संशोधनाचे गृहितके:

१) कुटूंब व्यवस्थेमध्ये महिलांना विविध स्तरावर शैक्षणिक अडचणी येतात.

२) कुटूंब व्यवस्थेमध्ये महिलांनी शिक्षण घेऊन म्हणून त्यांचा मानसिक, शारीरिक, आर्थिक व सामाजिक छळ केला जातो.

३) कौटूंबिक न्यायालयामध्ये महिलांना शैक्षणिक सूट व शैक्षणिक सवलती कुटूंबांमध्ये दिल्या जात नाहीत म्हणून कौटूंबिक न्यायालयात कौटूंबिक हिंसाचार कायद्याअंतर्गत केसेस दाखल होतात.

५. संशोधनाची गरज:

प्राथमिक शिक्षणापासून तर माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षणापर्यंत महिलांना शिक्षण घेण्यासाठी कुटूंबातून परिपूर्णपणे स्वातंत्र्य मिळत नाही याचे कारण विविध स्वरुपाचे असतात. त्यातील प्रमुख कारण म्हणजे पुरुषांची सामाजिक स्तरावरील जातीव्यवस्था व सामाजिक मानसिकता कारण जातीव्यवस्थेमुळे महिलांना चूल आणि मूल या घटकांबरोबरच त्यांनी शिक्षण घेतले नाही पाहिजे आणि केवळ कुटूंबाचे पोषण केले पाहिजे ही भूमिका सर्वच प्रकारच्या कुटूंबामध्ये आपल्याला पहावयास मिळते. तरच खऱ्या अर्थाने जर आपल्याला सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्य साजरा पण आढावा घेतला तर त्यांची प्रेरणा या महिलांना फार गरजेचे आहे ते तिला एकविसाव्या शतकामध्ये खूप मोठया प्रमाणामध्ये महिला उच्च शिक्षण घेत आहेत तरी पण त्या महिला शिक्षण घेताना त्यांच्या कुटूंबाचे परवानगी असणे फार गरजेचे असते.

महिलांना असंख्य अडचणींना सामोरे जात महिला शिक्षण घेता पण नेहमी तसे होत नाही बऱ्याच अंशी शिक्षण घेऊ नये म्हणून फार मोठया स्वरुपात दबाव आणि त्रास त्यांना होत असतो. मग महिलांना शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रास होतो. म्हणजे जर एखाद्या महिलांनी परिपूर्णपणे शिक्षण घेतलं तर त्या महिलांच्या शिक्षणामुळे घरातील संपूर्ण वातावरणच नाही तर बदलले जाते. ही म्हणणे हमी आपल्या कानावर येते तरीही पुरुषी मानसिकता ही त्या घटनेला अनुसरुन नेहमी व्यवस्थितपणे राहत नाही. पुरुषांना फक्त महिलांनी शिक्षण घेतले नाही पाहिजे. त्यांनी फक्त आपल्या घरचीच कामे परिपूर्णपणे करावेत हीच मानसिकता असते . या जातीच्या बाहेर जाऊन जर

आपण विचार केला तर वेगवेगळया दृष्टिकोनातून नांदेड जिल्हा नाही तर संपूर्ण भारत देशामध्ये कौटूंबिक न्यायालयांची स्थापना ज्या कारणामुळे केलेली आहेत याचे प्रमुख कारण म्हणजे की मुलींना किंवा महिलांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यातील प्रमुख समस्या म्हणजेच महिलांना शिक्षण घेऊ नये ही भूमिका कितपत योग्य आहे.

बांधिलकीच्या विविध स्तरावर समाज हा एकविसाव्या शतकात कुठे जात आहे आणि कुटूंब व्यवस्था कुठे जात आहे हा फार मोठा प्रश्न आहेत. तरीही आजच्या स्थितीला महिलांना विविध स्वरुपात मिळणारी संधीची समानता ही परिपूर्णपणे मिळत नाही. तरी ही महिला संघर्ष् करुन शिक्षण घेतात व त्यातून स्तःचं व्यक्तिमत्व विकास करतात. त्यांच्या अस्तित्वासाठी, त्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी संविधानातील विविध मूल्यांच्या अंतलबजावणीसाठी तरी ही त्यांना त्याप्रकारची परिपूर्णपणे सहकार्य समाजाकडून समाजातील व्यक्तिकडून व कुटूंबातील व्यक्तीकडून ही सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी फार मोठया प्रमाणामध्ये संघर्ष करावा लागतो. त्यासंघर्षामध्ये हा महिलांचा नाहक बळी जातो अशा खूप केसेस आहेत की ते शिक्षणामुळे महिलांना अक्षरक्षः फार मोठया स्वरुपामध्ये शारीरिक, मानसिक व भावनिक त्रास या कुटूंब व्यवस्थेतील लोकांनी केलेला आढळतो.

नांदेड जिल्ह्यात हा त्रास नसून विविध कौटूंबिक न्यायालयामध्ये अशा असंख्य केस आजही उपलब्ध आहेत व परिपूर्णपणे त्या सोडून झालेल्या नाहीयेत. त्याच कुटूंबातील असलेली सामाजिक रचना आहे त्या रचनेचा परिणाम त्यांच्या मानसिकतेवर झालेला आपल्याला आढळतो.

संशोधनात्मकदृष्टीने या घटकाचा विचार केला तर असे दिसून येते की, कौटूंबिक न्यायालयामध्ये कौटूंबिक हिंसाचा कायदा २००५ अंतर्गत खऱ्या अर्थाने होणारे जे काही केसेस आहेत त्या दखलपात्र किती आहेत आणि त्यात केसचे प्रमुख कारण शिक्षण आहे का याचा शोध घेणे खूप गरजेचे असून याप्रकारचे संशोधन केले तर भविष्यामध्ये कौटूंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत येणाऱ्या महिलांच्या केसेसचे प्रमाण कमी होण्यासाठी थोडया फार प्रमाणामध्ये मदत होईल अशी शाश्वती पण नाही पण असं म्हणता येईल. त्याच अंगाने जर विचार केला तर कौटूंबिक हिंसाचार कायदा २००५ मधील विविध कलमांचा आधार घेऊन महिलांना होणार या संशोधनाच्या माध्यमातून परावर्तीत करुन त्यांना शिक्षणाच्या परिपूर्णपणे २१ व्या शतकात देणेही काळाजी गरज आहे. त्यामुळे आपण जर केवळ महिलांच्या शिक्षणाचा जर विचार केला तर असे लक्षात येते की

महिलांना शिक्षण देणे ही केवळ एकविसाव्या शतकाची परिपूर्णपणे गरज आहे. याकरिता सदर संशोधकाने सदरील संशोधन कार्य निवडलेले आहे.

६. संशोधनाचे महत्त्वः

सदरील संशोधन हे केवळ कौटूंबिक हिंसाचार कायदा व कौटूंबिक न्यायालय पूरते मर्यादित नसून खऱ्या अर्थाने महिलांना परिपूर्णपणे शिक्षण देणे. महिलांना कुटूंब व्यवस्थेतून बाहेर काढणे व स्वतःच्या पायावर स्वतःच्या अस्तित्वासाठी स्वतःचा दर्जा सुधारणे. त्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी त्यांना परिपूर्णपणे तयार करणे अत्यंत महत्वाचे असून आजघडीला जगातील महिला या कुठे जात असून त्याचा भारतीय महिला कुठेही कमी पडू नयेत यासाठी मोठया प्रमाणामध्ये महत्व असून सद्यःस्थितीला कौटूंबिक हिंसाचार यामध्ये फार मोठया प्रमाणात केस दाखल होतात तर त्या केसमध्ये प्रमुख कारण शिक्षण हे असून जर शिक्षणामुळे त्यांचा विकास व्यक्तिमत्व विकास होत असेल तर त्या कुटूंबाचा परिपूर्णपणे पाठिंबा असणे गरजेचे आहे. कौटूंबिक न्यायालयामध्ये किंवा कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत येणाऱ्या विविध घटकानुसार देण्याची ही संधी समान मूल्य याबाबींचा विचार केला तर मूलभूत हक्कावरही महिलांच्या गदा आली का हा प्रश्न फार मोठया प्रमाणामध्ये डोकावतो. सद्यःस्थितीला फार मोठया प्रमाणामध्ये महिलांवर अत्याचार होत असताना एक पुरुष म्हणून आपली मानसिकता कशी असावी काय असावी आणि महिलांना कोणत्या प्रकारचा पाठिंबा दिला जावा यासंदर्भामध्ये आपल्याला खूप मोठयाप्रमाणात कार्य करणे व जनजागृती करणे गरजेचे असून सदरील संशोधन हा विषय भविष्यामध्ये कौटूंबिक न्यायालय मध्ये किंवा कौटूंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत केसेसचे प्रमाण कमी होऊन महिलांना व्यवस्थितपणे कौटूंबिक हिंसाचाराच्या अंतर्गत बाहेर काढून त्यांना शैक्षणिक हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यासाठी हा विषय निवडण्यात आलेला आहे.

७. संशोधनाची व्याप्ती व मर्यादाः

१. संदरील संशोधन नांदेड जिल्ह्यापूरते मर्यादित असून नांदेड मधील कौटूंबिक न्यायालयाचा विचार करण्यात येणार आहे.

२. नांदेड जिल्ह्यातील विविध तालूक्यामध्ये दाखल होणाऱ्या कुटूंब न्यायालयामध्ये कौटूंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत कारणांचा शोध घेणे.
३. नांदेड जिल्ह्यापूरते या संशोधनाची व्याप्ती आहे.
४. सदरील संशोधन हे २०१८ व २०१९ या दोन वर्षा पूर्वीचे मर्यादित आहे.
५. सदरील संशोधनात शिक्षित व अशिक्षित महिला यांचा समावेश करण्यात आला.
६. सदरील संशोधनात शिक्षित महिलांमध्ये दहावी, अकरावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, एम.फिल., पीएच.डी. पर्यंतच्या महिलांचा अभ्यास करण्यात येणार आहे.
७. संशोधन हे कौटूंबिक न्यायालयातील कौटूंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या विविध केसेसपूरते मर्यादित आहे.
८. त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यातील दाखलपात्र शैक्षणिक केसेसही आधार घेण्यात येणार आहे.

८. संशोधनाची पध्दती:

सदरील संशोधनाची सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वर्णनात्मक व विश्लेषण पध्दतीचा आधार घेण्यात येणार आहे.

९. संशोधनाची साधने:

सदरील संशोधनासाठी प्रश्नावली, मुलाखत व मतावली हे संशोधन साधन म्हणून वापर करण्यात येणार आहे.

९. संशोधनाची जनसंख्या:

सदरील संशोधनासाठी प्रश्नावली, मुलाखत व मतावली हे संशोधन साधन म्हणून वापर करण्यात येणार आहे.

१०. संशोधनाची जनसंख्या:

नांदेड जिल्ह्यातील कौटूंबिक न्यायालयात कौटूंबिक हिंसाचार कायदा अंतर्गत मागील २०१८, २०१९ मध्ये दाखल झालेल्या एकूण केसेस ह्या जनसंख्या मध्ये समाविष्ट होतात.

११. संशोधनाचा न्यादर्शः

नांदेड जिल्ह्यातील कौटूंबिक न्यायालयामध्ये कौटूंबिक हिंसाचार कायदा २००५ अंतर्गत दखलपात्र केलेल्या शैक्षणिक समस्या संदर्भात विविध १०० केसेसचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१२. संशोधनाचे विश्लेषणः

सदरील संशोधनाच्या विश्लेषणासाठी शेकडेवारी या तंत्राचा आधार घेण्यात येणार आहे.

१३. संशोधनाचा कालखंडः

संशोधनाचा कालखंड हा २०१८ ते २०२० पूरता मर्यादित आहे.

१४. संदर्भसूचीः

१. डॉ.अरविंद दुनाखे - प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान, नित्य नूतन प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २००५.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान, विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार, मुद्रित व प्रकाशित, १९९६.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान, सुधारित आवृत्ती विधी न्याय व कंपनी कार्य मंत्रालय, भारत सरकार मुद्रित व प्रकाशित, २०१३.

४. डॉ. भिंताडे शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन, २००९.

५. प्रा. घोडमोडे, शैक्षणिक संशोधनाचे मुलतत्वे, विद्या प्रकाशन, पुणे.

६. प्रा. मुळे व प्रा. उमाटे शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर साहित्य प्रसार केंद्र, १९७७.

७. डॉ. कदम, शैक्षणिक संख्याशास्त्र, नित्य नूतन प्रकाशन, पुणे, २०१७.

मार्गदर्शक | संशोधिका

प्राचार्य डॉ.मधुकर अंबाजी पुंडगे | **संध्या सोपानराव तुप्पेकर**